

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ९१ वा | मंगळवार, दि. ०३ नोव्हेंबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

महाराष्ट्रातील अनेक जिल्हा न्यायालयांना बॉम्बस्फोटाच्या धमक्या पोलीस यंत्रणा अलर्ट

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्रातील विविध जिल्हा न्यायालयांना बॉम्बस्फोट घडवून आणण्याच्या धमकीचे ई-मेल प्राप्त झाल्याने राज्यभरात खळबळ उडाली आहे. ठाणे, सांगली, सोलापूर, बीड, परभणी आणि हिंगोलीसह अनेक जिल्ह्यांतील न्यायालयांना धमकीचे संदेश मिळाल्याची माहिती समोर आली आहे.

या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून अनेक ठिकाणी न्यायालयीन इमारती रिकाम्या करण्यात आल्या असून, बॉम्ब शोधक व नाशक पथके आणि श्वान पथकांकडून तपासणी सुरू आहे. धमकीचे ई-मेल कोणी आणि कुठून पाठवले, याचा तपास सायबर पोलिसांकडून केला जात आहे.

ठाणे न्यायालयाला धमकीचा ई-मेल; दोन्ही इमारती रिकाम्या

ठाणे जिल्हा न्यायालयात आयईडी स्फोट घडवण्याची धमकी ई-मेलद्वारे देण्यात आली. या प्रकरणी ठाणे परिमंडळ-१ चे पोलीस उपायुक्त बाळासाहेब पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, न्यायालयाच्या रजिस्ट्रार कार्यालयाच्या अधिकृत ई-मेलवर सकाळी ९.४३ वाजता धमकीचा संदेश प्राप्त झाला. न्यायालयात बॉम्ब ठेवण्यात आल्याचा आणि दुपारी ३.११ वाजता त्याचा स्फोट होणार असल्याचा उल्लेख पंजाबी भाषेतील संदेशात होता.

ई-मेल मिळताच मानक कार्यपद्धतीनुसार न्यायालयाच्या दोन्ही इमारती रिकाम्या करण्यात आल्या. इमारतींमधील न्यायाधीश, वकील, कर्मचारी आणि नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले. परिसरापासून सुमारे १०० मीटर अंतरावर नागरिकांना नेण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

बॉम्ब शोधक व नाशक पथकाकडून दोन्ही इमारतींचे सर्व मजले, पार्किंग क्षेत्र, कॅन्टीन आणि परिसराची तपासणी करण्यात येत आहे. गुन्हे शाखा आणि सायबर सेलचे अधिकारीही या प्रकरणाचा तपास करत आहेत.



दरम्यान, धमकीच्या ई-मेलमध्ये २७ नोव्हेंबरपर्यंत ठाणे जिल्हा न्यायालयात स्फोट घडवण्याचा उल्लेख असल्याची माहिती आहे. तसेच मेट्रो स्थानकांवर रात्री ९.११ वाजता स्फोट घडवण्याची धमकीही देण्यात आल्याचा दावा आहे. १९८४ मधील घटनेचा बदला घेण्याचा उल्लेख आणि दिलजीत दोसांझ यांच्या २७ नोव्हेंबर रोजी महालक्ष्मी रेसकोर्स येथे होणाऱ्या कार्यक्रमालाही लक्ष्य करण्याची धमकी ई-मेलमध्ये असल्याचे सांगण्यात येत आहे. या सर्व दाव्यांची पोलीस यंत्रणांकडून पडताळणी सुरू आहे.

सायबर पोलिसांकडून ई-मेलचा स्रोत शोधण्याचे काम

राज्यातील विविध न्यायालयांना धमकीचे ई-मेल प्राप्त झाल्यानंतर पोलीस यंत्रणांनी सुरक्षा व्यवस्था वाढवली आहे. बॉम्ब शोधक व नाशक पथकांकडून संबंधित इमारतींची तपासणी केली जात आहे. दुसरीकडे, ई-मेल पाठवणाऱ्या व्यक्तीचा शोध घेण्यासाठी सायबर पोलीस तपास करत आहेत. या धमक्यांमध्ये कितपत तथ्य आहे, हे तपासानंतर स्पष्ट होणार आहे. तोपर्यंत नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता पोलिसांच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

सांगली जिल्हा न्यायालयातही तपासणी

सांगली जिल्हा व सत्र न्यायालयालाही बॉम्ब ठेवल्याचा धमकीचा ई-मेल प्राप्त झाला. त्यानंतर जिल्हा पोलीस दलाचे बॉम्ब शोधक पथक आणि श्वान पथक न्यायालय परिसरात दाखल झाले. सुरक्षेच्या कारणास्तव न्यायाधीश, वकील आणि पक्षकारांना इमारतीबाहेर काढण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी सुमारे दीड वाजण्याच्या सुमारास ई-मेल प्राप्त झाला होता. त्यामध्ये दुपारी ३.११ वाजता न्यायालयाची इमारत उडवून देण्याची धमकी असल्याचे सांगण्यात आले. पोलिसांकडून संपूर्ण परिसराची तपासणी करण्यात आली.

सोलापूर न्यायालय परिसरही रिकामा

सांगली आणि सातऱ्यानंतर सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालयालाही धमकीचा ई-मेल मिळाल्याची माहिती आहे. ई-मेल प्राप्त होताच वरिष्ठ पोलीस अधिकारी न्यायालयात दाखल झाले. सुरक्षेच्या दृष्टीने न्यायाधीश, वकील, कर्मचारी आणि पक्षकारांना इमारतीबाहेर काढण्यात आले. त्यानंतर संपूर्ण न्यायालय परिसराची तपासणी सुरू करण्यात आली.

परभणी आणि हिंगोलीत पोलीस यंत्रणा सतर्क

परभणी जिल्हा न्यायालयालाही धमकीचा ई-मेल प्राप्त झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर न्यायालय परिसरात श्वान पथक आणि बॉम्ब शोधक व नाशक पथक दाखल झाले. पोलिसांकडून इमारतीची तपासणी करण्यात येत असून, ई-मेलच्या स्रोताचा शोध घेतला जात आहे.

हिंगोली जिल्हा व सत्र न्यायालयालाही न्यायालयाच्या अधिकृत ई-मेलवर सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास धमकीचा संदेश प्राप्त झाल्याची माहिती आहे. यानंतर बॉम्ब शोधक पथक, श्वान पथक, हिंगोली शहर पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी न्यायालयात दाखल झाले. संपूर्ण इमारतीची तपासणी सुरू करण्यात आली असून सायबर पोलिसांकडूनही ई-मेलची चौकशी केली जात आहे.

बीडमध्येही न्यायालयाची इमारत रिकामी

बीड जिल्हा व सत्र न्यायालयाला बॉम्ब ठेवल्याचा धमकीचा ई-मेल मिळाल्याने परिसरात खळबळ उडाली. खबरदारी म्हणून न्यायालयातील न्यायाधीश, वकील, पक्षकार आणि कर्मचाऱ्यांना तातडीने बाहेर काढण्यात आले. वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले असून, पोलीस पथकाकडून इमारतीची तपासणी सुरू करण्यात आली.

बीड पोलिसांनी नागरिकांना शांतता राखण्याचे आणि न्यायालय परिसरात गर्दी न करण्याचे आवाहन केले आहे. पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांनी सायबर पोलिसांकडून ई-मेलमधील माहितीची पडताळणी सुरू असल्याचे सांगितले. लवकरात लवकर न्यायालयीन कामकाज पूर्ववत सुरू व्हावे, यासाठी प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हा परिषदेत 'रुक्मिणी दिवाळी महोत्सव २०२६'चे उत्साहात उद्घाटन

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- ग्रामीण भागातील महिलांच्या स्वावलंबनाला चालना देण्यासाठी, त्यांच्या कौशल्याला बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी आणि महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना व्यापक व्यासपीठ मिळवून देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागांतर्गत जिल्हा परिषद सोलापूर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा आणि उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'रुक्मिणी दिवाळी महोत्सव २०२६'ला जिल्हा परिषद परिसरात उत्साहात सुरुवात झाली.

सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या महोत्सवाचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ॲड.अमृता वाघे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, जिल्हा परिषद सदस्य शिवाजी नाना कांबळे, सचिन जाधव जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप, जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे, जिल्हा व्यवस्थापक राहुल जाधव, संतोष डोंबे मीनाक्षी मडीवळी,दयानंद सरवळे, लेखाधिकारी शुभांगी देशपांडे यांच्यासह तालुका अभियान व्यवस्थापक, तालुका व्यवस्थापक, प्रभाग समन्वयक विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून महोत्सवाचा शुभारंभ करण्यात आला.

महोत्सवाच्या उद्घाटनानंतर उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांनी महिला बचत गटांच्या स्टॉलला भेट देत महिलांशी संवाद साधला.



नागरिकांनी महोत्सवाला भेट देऊन स्थानिक उत्पादनांना द्यावे प्रोत्साहन

रुक्मिणी दिवाळी महोत्सवाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिला बचत गटांना आपल्या उत्पादनांचे प्रदर्शन व विक्री करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. या महोत्सवात महिलांनी तयार केलेल्या विविध वस्तू व उत्पादनांचे स्टॉल उभारण्यात आले आहेत. नागरिकांनी या महोत्सवाला आवर्जून भेट देऊन महिला बचत गटांकडून वस्तूंची खरेदी करावी आणि ग्रामीण महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाच्या प्रवासाला हातभार लावावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी केले.

विशेष म्हणजे, त्यांनी स्वामिनी महिला बचत गटाच्या स्टॉलवरून स्वतः विविध उत्पादनांची खरेदी करून महिला उद्योजिकांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन दिले.यावेळी त्यांनी बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंची माहिती घेतली तसेच ग्रामीण महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ मिळण्यासाठी प्रयत्न करावे.

मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी महोत्सवातील सर्व महिला बचत गटांच्या स्टॉलला भेट देऊन उत्पादनांची पाहणी केली. प्रत्येक बचत गटाच्या महिलांशी संवाद साधत त्यांनी उत्पादनांची निर्मिती, गुणवत्ता, विक्री आणि बाजारपेठ याबाबत माहिती जाणून घेतली.

यावेळी त्यांनी महिला बचत गटांच्या उत्पादनांची गुणवत्ता चांगली असल्याचे नमूद करत, उत्पादनांच्या आकर्षक व दर्जेदार पॅकेजिंगकडे विशेष लक्ष देण्याच्या सूचना केल्या. उत्पादन कितीही चांगले असले तरी ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी त्याचे सादरीकरण, पॅकिंग, ब्रँडिंग आणि दर्जा यांना महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले. पुढील महोत्सवात उत्पादनांचे पॅकेजिंग अधिक आकर्षक व व्यावसायिक स्वरूपात करण्यासाठी आवश्यक त्या सुधारणा करण्याचे मार्गदर्शनही त्यांनी केले.

महिला व बालकल्याण समितीच्या सभापती अँड.अमृता वाघे यांनीदेखील बचत गटांच्या महिलांशी संवाद साधून त्यांच्या उत्पादनांचे कौतुक केले. महिलांनी केवळ उत्पादन निर्मितीपुरते मर्यादित न राहता विक्री, विपणन आणि उत्पादनांची गुणवत्ता वाढविण्यावर भर द्यावा, असे आवाहन केले.

ऊस दर निश्चितीसाठी कारखानदारांना तीन दिवसांची मुदत

साखर कारखानदारांच्या अनुपस्थितीमुळे शेतकरी संघटना आक्रमक

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- ऊस गाळप हंगामच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी पहिल्या उचलपोटी प्रतिटन ३,५०० रुपये दर जाहीर करावा, या मागणीसाठी जिल्हा प्रशासनाने बोलावलेली बैठक साखर कारखानदारांच्या अनुपस्थितीमुळे पूर्णपणे निष्फळ ठरली.

बैठकीस जिल्ह्यातील एकाही कारखान्याचे कार्यकारी संचालक उपस्थित न राहिल्याने शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींनी तीव्र संताप व्यक्त केला. प्रशासन आणि कारखानदारांच्या संगनमताने शेतकऱ्यांची दिशाभूल करण्याचा हा फार्स सुरू असल्याचा थेट आरोप करत संघटनांनी निषेध नोंदवला. दरम्यान, या बैठकीनंतर जिल्हा प्रशासनाने कारखानदारांना शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून पुढील तीन दिवसांत ऊस दर निश्चित करण्याच्या सूचना देण्यात आल्या.



बैठकीवर बहिष्कार सदृश स्थिती, प्रशासनावर मिलीभगतीचा आरोप...

बैठकीसाठी साखर कारखान्यांच्या कार्यकारी संचालकांना अधिकृत निमंत्रण देण्यात आले होते. अनेक कारखान्यांचे एमडी सोलापूर शहरापर्यंत पोहोचले असतानाही प्रशासनातील अधिकाऱ्यांनी त्यांना जाणूनबुजून बैठकीच्या ठिकाणी येऊ दिले नाही, असा आरोप शेतकरी संघटनेचे विजय रणदिवे यांनी केला. आधीच ऊस वाळू लागल्याने शेतकरी हवालदिल झाला असून, कारखाने सुरू करण्यास उशीर झाल्यास शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार आहे. याच परिस्थितीचा फायदा घेत शेतकऱ्यांना कोंडीत पकडून कवडीमोल दर देण्याचा कारखानदारांचा डाव असल्याचा दावा संघटनांनी केला.

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात जिल्हा प्रशासनाच्या वतीने शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींची महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला अप्पर जिल्हाधिकारी गणेश निम्हाळी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील, साखर प्रादेशिक सहसंचालक किरण गायकवाड, साखर प्रादेशिक उपसंचालक नानासाहेब रुपनवर, विशेष लेखापरीक्षक बी. सी. पवार, विष्णू डोके, संतोष मानूरकर उपस्थित होते. तर शेतकरी संघटनांकडून ऊस नियंत्रण मंडळाचे सुहास पाटील, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे विजय रणदिवे, रयत क्रांती संघटनेचे नामदेव पवार, डिजिटल शेतकरी संघटनेचे अनिल आबाजी पाटील व महाराष्ट्र राज्य जनहित शेतकरी संघटनेचे प्रभाकर ऊर्फ दिनकर भैया देशमुख उपस्थित होते.

साखरेचे दर वाढले, मग ऊस दराबाबत चालढकल का?

शेतकरी संघटनांनी बैठकीत आपली भूमिका मांडताना सांगितले की, गेल्या वर्षी साखर ३,४०० ते ३,५०० रुपये प्रतिक्विंटल असताना कारखान्यांनी ३,००० रुपये दर दिला होता. यंदा खुल्या बाजारात साखरेचे भाव ४,८०० ते ५,२०० रुपयांपर्यंत पोहोचले असून क्विंटलमागे १,५०० ते १,६०० रुपयांची वाढ झाली आहे. अशा स्थितीत शेतकऱ्यांना प्रतिटन ३,५०० रुपयांची पहिली उचल देणे पूर्णपणे रास्त आहे. काही कारखान्यांनी २,८०० ते ३,००० रुपयांचे दर प्रशासनाकडे पत्राद्वारे कळविले आहे. पण, तो दर शेतकऱ्यांना मंजूर नाही, अशी भूमिका संघटनांनी घेतली.

दरम्यान, प्रशासनाने शेतकरी प्रतिनिधींची निवेदने स्वीकारत साखर कारखानदारांना तीन दिवसांची मुदत दिली आहे. येत्या ५ तारखेच्या आत कारखान्यांच्या चेअरमन आणि कार्यकारी संचालकांची उपस्थितीत थेट बैठक घेऊन दर जाहीर न केल्यास, आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा शेतकरी संघटनांनी दिला आहे.

अवैध सावकारीविरोधात सहकार विभागाची कारवाई

सोनके येथे चार जणांच्या घरांची झडती

पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):- पंढरपूर तालुक्यात अवैध सावकारीला आळा घालण्यासाठी सहकार विभागाने महत्त्वपूर्ण कारवाई सुरु केली आहे. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था मुकुंद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था सुनील तेलंगरे यांच्या नेतृत्वाखाली सोनके येथे चार जणांच्या घरांची झडती घेण्यात आली.

मौजे सोनके, (ता. पंढरपूर), येथे महाराष्ट्र सावकारी नियमन अधिनियम 2014 च्या कलम 16 अन्वये ही कारवाई करण्यात आली.



या कारवाईदरम्यान सागर जनार्दन कोळेकर, सचिन मारुती पाटील (खरात), रणजित आजिनाथ कोळेकर आणि महेश गलांडे या सर्व सोनके येथील रहिवाशांच्या घरांची झडती घेण्यात आली. या कारवाईसाठी पथकप्रमुख पी. बी. सावंत, एस. एस. सांगोलकर, एस. एस. जाधव आणि ए. जी. जाधव यांच्या पथकाने सहभाग घेतला. घरझडतीदरम्यान आढळून आलेल्या संशयास्पद कागदपत्रांची चौकशी व तपासणी सुरू आहे. या तपासणीतून उपलब्ध होणारे सबळ पुरावे आणि कागदपत्रांच्या आधारे पुढील योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था सुनील तेलंगरे यांनी दिली.

पंढरपूर तालुक्यातील नागरिकांनी अवैध सावकारीसंदर्भात काही तक्रारी किंवा माहिती असल्यास तातडीने सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पंढरपूर या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहनही सहाय्यक निबंधक सुनील तेलंगरे यांनी केले आहे.



गाव विक्रीला काढलेल्या तुळशीला शरद पवारांचा आधार; दुष्काळग्रस्तांसाठी ५० लाखांची मदत!

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- पाणीटंचाई आणि दुष्काळाच्या तीव्र झळांमुळे गावच विक्रीला काढण्याची वेळ आलेल्या माढा तालुक्यातील तुळशी गावाला ज्येष्ठ नेते खा. शरदचंद्र पवार यांनी भेट देत ग्रामस्थांना दिलासा दिला.

दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधणाऱ्या पवार यांनी दुष्काळग्रस्त भागासाठी ५० लाख रुपयांचा धनादेश दिला. संकटाच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याच्या त्यांच्या भूमिकेची या दौऱ्याच्या निमित्ताने चर्चा होत आहे.

तुळशी गावातील पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर बनला असून, पिण्याच्या पाण्यासाठी होणारी वणवण आणि शेतीच्या नुकसानीमुळे ग्रामस्थ त्रस्त आहेत. गावातील भीषण परिस्थितीकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ग्रामस्थांनी 'गाव विकणे आहे' असे फलक लावले होते. या घटनेमुळे तुळशी गावातील दुष्काळाची समस्या राज्यभर चर्चेत आली होती. याच पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी गावाला भेट देऊन परिस्थितीची माहिती घेतली.

पावसाने ओढ दिल्याने पिके सुकत आहेत. पिण्याच्या पाण्याची टंचाई, जनावरांसाठी चारा उपलब्ध करण्याचे आव्हान आणि शेतीतून उत्पन्न मिळण्याची आशा मावळल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. या परिस्थितीत शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत पवार यांनी त्यांच्या अडचणी आणि व्यथा जाणून घेतल्या. संकटातून मार्ग काढण्यासाठी शासन आणि



प्रशासनाकडे पाठपुरावा करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

दुष्काळाची तीव्रता लक्षात घेऊन पवार यांनी दुष्काळग्रस्त भागासाठी ५० लाख रुपयांचा धनादेश दिला. केवळ परिस्थितीची पाहणी न करता मदतीचा हात पुढे केल्याने या निर्णयाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. मात्र, दीर्घकाळापासून भेडसावणारा पाणीटंचाईचा प्रश्न कायमस्वरूपी सुटावा, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर पवार यांनी सोलापूर जिल्ह्यातील पाणीटंचाई आणि चारा प्रश्नाच्या गंभीरतेकडेही लक्ष वेधले. त्यांच्या माध्यमांतील वक्तव्यानुसार, जिल्ह्यातील १३९ गावांना १३५ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात होता, तर माढा विधानसभा मतदारसंघात ११० टँकरची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा आणि रोजगार उपलब्ध करून देणे या बाबींना प्राधान्य देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

संपादकीय

सत्तेच्या ताटात कुरघोड्यांची माती !

विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांतील पाच जागांपैकी केवळ दोन जागा महायुतीच्या पदरी पडल्या. पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपचे कौस्तुभ गावडे आणि अमरावती शिक्षक मतदारसंघात शिवसेनेचे किरण सरनाईक विजयी झाले. तिन्ही पदवीधर जागा मात्र महाविकास आघाडीने खिशात घातल्या. विधानसभेत प्रचंड बहुमत आणि सत्तेची सारी साधने हाताशी असतानाही असा निकाल लागणे हे सत्ताधाऱ्यांसाठी खचितच चिंताजनक आहे. पदवीधरांच्या तिन्ही जागा विरोधकांनी जिंकण्यामागे जेन झी आंदोलनाचा परिणाम आहे; तसाच सत्ताधाऱ्यांमधील आपसांतील कुरघोड्यादेखील याला कारणीभूत आहेत. निकाल हाती आल्यानंतर पराभवामागील कारणांची वस्तुनिष्ठ छाननी करण्याऐवजी भाजप आणि शिवसेनेच्या प्रवक्त्यांनी एकमेकांवर सुरू केलेल्या चिखलफेकीला लगाम घालण्यासाठी आता स्वतः देवेंद्र फडणवीस व एकनाथ शिंदे पुढे सरसावले आहेत. मात्र, यातून दुखावलेल्या मनांमुळे महायुतीच्या भक्कम भिंतीला तडे गेले आहेत. राजकारणाच्या ऊन-पावसात ते तडे खिंडारांत परिवर्तित होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या निवडणुकीचे अन्वयार्थ समजून घ्यायला हवेत.

'शिवसेनेने साथ दिली असती तर महायुतीने पाचही जागा जिंकल्या असत्या,' असा दावा भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांनी या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केला आहे. पुण्यात ऐन वेळी अपक्ष सचिन सानप यांना पाठिंबा देऊन शिवसेनेने महायुतीच्या एकजुटीलाच धक्का दिला. पुण्यातील एका जागेच्या 'हव्यासापोटी' शिवसेनेने मित्रपक्षांना अडचणीत आणले आणि पदवीधरच्या तिन्ही जागा गमावण्याची वेळ आणली, असेही त्यांनी सुनावले. सानप यांना शिक्षक मतदारसंघात मिळालेली दहा-बारा हजार मते पदवीधरमध्येही युतीकडे वळू शकली असती, हा त्यांचा हिशेब आहे. मात्र यावर शिवसेनेचे उत्तर काय, तर 'आम्ही युतीधर्म पाळतो,' असे एकनाथ शिंदे सांगतात.

कार्यकर्त्यांच्या भावना लक्षात घेऊन सानप यांना पाठिंबा दिला, अशी सारवासारव शिवसेनेकडून झाली. कार्यकर्त्यांच्या भावना इतक्याच महत्त्वाच्या होत्या, तर त्या जागावाटपाच्या बैठकीतच का मांडल्या गेल्या नाहीत? प्रवक्ते आनंद परांजपे यांनी तर, सगळ्या जागा स्वतःच लढवण्याचा अट्टहास भाजपने सोडावा, असे सांगून नागपूरच्या पराभवाकडे बोट दाखवले. आपल्या चुकीचे उत्तर देण्याऐवजी मित्राच्या जखमेवर बोट ठेवणे, ही राजकीय प्रगल्भता नव्हे. नागपूरचा पराभव भाजपसाठी अडचणीचा आहे, हे खरे. तिथे सुधाकर कोहळे यांच्या पराभवात सुमारे नऊ हजार बाद मतांचा मोठा वाटा असून त्याचे उत्तर भाजपलाच शोधावे लागेल; पण त्यामुळे पुण्यातील शिवसेनेच्या खेळीचे समर्थन होत नाही. सत्तेत वाटा घ्यायचा, मंत्रिपदे उपभोगायची आणि निवडणुकीत मित्राचेच पाय ओढायचे, हा दुटप्पीपणा आहे.

मुळात मनोज जरांगेंनी ध्वनिफीत समोर आणून केलेल्या पाचशे कोटी रुपयांच्या आरोपावरून भाजप व शिवसेनेत सारे काही आलबेल नसल्याचे समोर आले होतेच. आता विधान परिषदेतील पराभवावरून नवे वादळ युतीमध्ये घोंघावते आहे. या सगळ्याला मुख्यमंत्रिपदी पुन्हा बसण्याच्या एकनाथ शिंदे यांच्या तीव्र इच्छेचीही किनार आहे. शिंदे यांच्या नेतृत्वाखाली लढलेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला यश मिळाले. 'लाडकी बहीण'सारखी योजना ही आपल्या डोक्यातून आलेली सुपीक कल्पना होती; विधानसभा निवडणुकीचा सगळा राजकीय, आर्थिक भार शिंदे यांनी स्वतःच्या खांद्यावरच पेलला अशा प्रकारच्या मानसिकतेतून शिंदे यांचे सगळे शिलेदार कायम ते मुख्यमंत्री होण्याची स्वप्ने पाहत असतात.

सर्वोच्च पदाची आकांक्षा बाळगणे राजकारणात गैर नाही. मात्र, त्यापूर्वी अंगी असलेल्या राजकीय बळाचाही अंदाज असायला हवा. नाही, तर अती महत्त्वाकांक्षा राजकीय विनाशाकडेच नेतात. भाजपकडे असलेले १३५ आमदारांचे पाठबळ हीच त्यांच्यापाशी असलेली मुख्यमंत्रिपदाची गुरुकिल्ली आहे. दिल्लीतील भाजपच्या शीर्षस्थ नेत्यांपैकी काहीजण आपल्या पाठीवरून हात फिरवतात. केवळ त्यामुळेच कधी तरी ही किल्ली आपल्या हाती येईल, अशा भ्रमात राहिल्यानेच राज्यातील राजकीय कुरघोड्या वाढल्या आहेत. भरल्या ताटात कालवली जाणारी माती तोंडात जाण्यापूर्वीच याला आवर घालण्याचे काम भाजपच्या शीर्षस्थ नेतृत्वाने करावे.

राजकीय पुढाऱ्यांची दिवाळी जोमात; तर दुष्काळ-महागाईमुळे शेतकरी, गरीब व सर्वसामान्य कोमात!

गेल्या काही वर्षापासून राजकीय पुढारी कमी कालावधीत करोडपती झाल्याचे दिसून येते.त्यामुळे त्यांचे वर्चस्व देशातील प्रत्येक राज्यात आपल्याला पहायला मिळते.परंतु याचे गंभीर परिणाम देशातील शेतकरी वर्ग, सुशिक्षित बेरोगार वर्ग, गरीब व सर्वसामान्य वर्ग यांना भोगावे लागत आहे.सध्या देशावर कोरड्या दुष्काळाचे गंभीर संकट ओढावले आहे. परंतु हा कोरडा दुष्काळ सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे निर्माण झालेली गंभीर समस्या आहे. राज्यासह देशात जी दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे ती मानवजातीने ओढावलेली विनाशलिलाच म्हणावी लागेल. कारण मानवाने स्वतःच्या सुख-सुविधांसाठी राज्यासह देशात दररोज लाखो वृक्षांची कत्तल होत आहे, मोठ्या प्रमाणात सिमेंटीकरण, औद्योगीकरण, शहरीकरण, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यामुळे वातावरणात सर्वत्र बदल झाल्याचे दिसून येते आणि त्यांच्या गंभीर परिणामाला सुरूवात झाली आहे व यापुढे आणखी भयानक परिस्थिती निर्माण होऊ शकते याला नाकारता येत नाही. देशातील कोरडा दुष्काळ हा नियोजनाच्या अभावामुळे व सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे निर्माण झालेली गंभीर समस्या असून सरकारने निसर्गाची राखरांगोळी केली व भयावह समस्या निर्माण केल्या आहेत व याचे प्रायश्चित्त शेतकरी,गरीब व सर्वसामान्यांना वेगवेगळ्या समस्यांच्या रूपात भोगाव्या लागणार आहे आणि भोगत आहेत.आज अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की,राजकीय पुढाऱ्यांची दिवाळी जोमात; परंतु दुष्काळामुळे व महागाईमुळे शेतकरी, गरीब, सर्वसामान्य कोमात असल्याचे सर्वत्र चित्र दिसत आहे.देशातील दुष्काळाच्या अंधक्कारामुळे सणासुदीचा उत्साह जनुकाय हरविला की काय असे चित्र सर्वत्र दिसत आहे.दिवाळी सण म्हटला की, सर्वत्र झगमगाट, लहान-मोठे, आबालवृद्ध या सर्वांमध्ये आनंदाचे व खुशीचे वातावरण असते. परंतू यावर्षी कमी पावसामुळे आणि हवामान बदलामुळे सर्वत्र कोरड्या दुष्काळाचे सावट निर्माण झाले आहे.यामुळे शेतकरी अत्यंत अडचणीत सापडला असून याची झळ महागाईच्या रूपात गरीब व सर्वसामान्यांना भोगावी लागणार आहे व भोगत आहेत.सोबतच शेतीसाठी व सर्वसामान्यांना पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे.सरकार मोठ्या प्रमाणात विकास कामे करीत आहे यात तिळमात्र शंका नाही. परंतु विकासाचे योग्य नियोजन नसल्याने विकासाच्या नावाखाली सरकारने निसगार्ची अवहेलना करून हत्या केली आणि त्याचे प्रायश्चित्त आज राज्यासह देशातील लोकांना, पशुपक्ष्यांना व संपूर्ण जीव-जंतुंना भोगावे लागत आहे. सरकारने विकास कामे करतांना पुढे याचे काय गंभीर दुष्परिणाम होईल याचा सरकारने कदापि विचार केलेला नाही. त्यामुळे आज राज्यासह देशात दिवसेंदिवस गंभीर जल संकट, उष्णतेमध्ये वाढ आणि आरोग्यावर गंभीर परिणाम या नैसर्गिक समस्या निर्माण झाल्याने अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.आज सरकारने औद्योगीकरण, शहरीकरण, खनणन, सिमेंट रोड, उडान पुल अशाप्रकारे सर्वत्र सिमेंटीकरणाचे जाळे पसरवुन राज्यासह देशात विकासाचा सपाटा लावला खरा परंतु वृक्षांचा हिरवागार गालिचा नेस्तनाबूत केला आहे. राज्यासह देशात कोरडा दुष्काळ असुनही मोठ्या प्रमाणात सिमेंट कॉंक्रेटचे काम आताही सुरूच आहे यामध्ये मुख्यत्वेकरून सरकारी आवास, बिल्डिंग, भवन, नवीन एअरपोर्ट,विधानभवन इत्यादी अनेक कामे विकासाच्या नावाखाली सुरू असून यात सरकारने करोडो रुपयांची गुंतवणूक केली आहे.परंतु सरकार शेतकऱ्यांच्या प्रती उदासीन असल्याचे दिसून येते व आर्थिक मदत करण्यास हिचकिचावत आहे.सरकारने शेतकऱ्यांना फक्त ५ हजार रुपये मदत करून तोंडाला पाने पुसण्याचे काम केले.देशाच्या १४५ कोटी जनतेला व संपूर्ण जीवसृष्टीला ज्या निसगार्ची गरज आहे त्याकडे सरकार डोळे बंद करून पाठ फिरवितांना दिसते.आज सिमेंटीकरणाच्या दुप्पट वृक्षलागवड करणे गरजेचे होते.परंतु तसे काहीच दिसत नाही व संपूर्ण वृक्षारोपण फक्त कागदावर आणि राजकीय पुढारी वृक्षलागवडीच्या नावाखाली फोटो काढून फोटोसेशनवर भिडले असून मिडियावर हावी झाल्याचे दिसून येते. राजकीय पुढारी एक वृक्ष लावल्यानंतर त्याकडे ढुंकूनही पाहत नाही अशी गंभीर परिस्थिती सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी निर्माण करून ठेवली आहे आणि त्याचे प्रायश्चित्त शेतकरी, शेतमजूर व राज्यासह देशाची जनता दुष्काळाच्या रूपात भोगत आहेत तर सर्वसामान्य व गरीब माणूस महागाईच्या आगीत होरपळत आहे आणि निसर्गाचे आसू कोरडे झाले असून निसर्ग व्याकूळ झाला आहे व याची झळ पशुपक्षी आणि संपूर्ण जीवजंतू भोगत असुन त्यांच्यावर सुद्धा गंभीर संकट ओढवले आहे.यामुळे मरावे की जगावे अशी सर्वांचीच गंभीर परिस्थिती झाली आहे.म्हणजे सरकारने निसर्गावर अत्याचार करून त्याकडे दुर्लक्ष केल्याने अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत.सरकार विकासाच्या नावाखाली मोठमोठी सरकारी हॉस्पिटल तयार करीत आहे. परंतु निसगार्ची पायमल्ली करून बदलत्या हवामानामुळे निर्माण झालेल्या आरोग्याच्या गंभीर समस्या याकडे सरकार दुर्लक्ष करतांना दिसते. शेतकरी दुष्काळाने होरपळत आहे आणि सरकार सरळ हातांनी मदत न करता समिति नेमून सरकार दीर्घकालीन उपाय शोधत आहे ही कसली मदत म्हणावी! आज जर सरकार १४५ कोटी जनतेच्या पोटाची खळगी भरणाऱ्या शेतकऱ्यांना सरकार सरळ हातांनी मदत करीत नसेल तर या राजकीय पुढाऱ्यांचा काय फायदा? भारताला मोठा मान आहे तो म्हणजे भारत कृषीप्रधान देश आहे.परंतु आता सरकारने शेतकऱ्यांना हवालदिल केले असून कॉंक्रीट प्रधान व राजकीय पुढारी प्रधान देश केल्याचे दिसून येते. आज शेतकऱ्यांजवळ करोडोंची संपत्ती आहे व मनाने श्रीमंत आहे;तरी तो आर्थिक दृष्ट्या शुन्य आहे असे का? याचा सरकारने कधीच गांभीर्याने विचार केला नाही आणि करणार नाही.यामुळेच देशात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. शेतकरी श्रीमंत झाले तर राजकीय पुढाऱ्यांचे राजकारण नामशेष होईल.त्यामुळे सरकार व संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांनी शेतकऱ्यांना आपले बाहूले बनवून दाबून ठेवले आहे.आज शेतकरी राबराब राबतो तरीही त्यांच्या डोळ्यात अश्रूंच्या धारा दिसतात. कारण शेतात तो जेवढी मेहनत करतो त्याचा मोबदला नगन्य असतो.आज शेतातील माल निघतो दलालांच्या मार्फत बाजारपेठेत जातो.परंतु शेतकरी जो माल सरकारला किंवा दलालांना विकतात त्याचा मोबदला फक्त शंभर पैकी दहा टक्के मिळतो. त्यामुळे आपण पहातो व्यापारी, दलाल मोठ्या एकीने सोन्याची चैन, अंगठी घालून समाजात मिरवितो आणि त्याच ठिकाणी शेतकरी आपला सर्वसामान्यांसारखे जीवन जगतो. याचे मुख्य कारण म्हणजे सरकार, व्यापारी, व्यवसायी यांची कुठेतरी साठगाठ असते त्यामुळे शेतकरी नेहमीच आपल्याला काळजीत दिसतो व चिंतेत दिसतो आणि त्यातूनच जर जीवन असह्य झाले तर त्याच्यावर आत्महत्येची पाळी येते. ह्या संपूर्ण बाबी सरकारला माहीत असुनही डोळ्यावर पट्टी बांधून व कानावर हात ठेवून तमाशा बघत असतात हे कटू सत्य आहे आणि याची झळ शेतकऱ्यांच्या संपूर्ण कुटुंबाला भोगावी लागते.सरकारला माहित आहे कि शेतकरी मोठा संकटात सापडला आहे.अशा परिस्थितीत राज्यासह देशातील आजी-माजी आमदार-खासदार,मंत्री,राजकीय पुढारी यांनी आपल्या वेतनातून, पेंशनमधून व इतर भत्त्यातील ८० टक्के रक्कम सरकारी तिजोरीत टाकून शेतकऱ्यांना रोख स्वरूपात आर्थिक मदत द्यायला हवी.परंतु राजकीय पुढारी असे कदापि करणार नाही.स्वतःला शेतकऱ्यांपेक्षा जास्त गरीब समजतात.यावरून मला तर असे वाटते की शेतकरी श्रीमंत आणि राजकीय पुढारी भिकारी आहेत की काय! महाराष्ट्राचा विचार केला तर २०१२-१३ मध्ये महाभयंकर दुष्काळ पडला होता यात ९२३ तालुके दुष्काळाच्या कक्षेत होते त्यावेळेसचा दुष्काळ हा नैसर्गिक होता. परंतु सध्याचा दुष्काळ हा सरकारच्या चुकांमुळे आणि नियोजनाच्या अभावामुळे निर्णय झालेला गंभीर दुष्काळ आहे आणि हा फक्त महाराष्ट्रापुरता सिमीत नसून याचे पडसाद संपूर्ण देशभरात दिसून येते.कारण विकासाच्या नावाखाली लाखो वृक्षांची कत्तल दररोज होत आहे यामुळेच हवामानात आमुलाग्र बदल झाला आहे व यामुळे अलनिनोचा प्रभाव वाढला, जमिनीच्या पोटातील पाणी कमी झाले आणि संपूर्ण निसर्गाचे संतुलन डगमगल्याने दुष्काळाची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. म्हणजेच मानवाने आपल्या सुखसुविधांसाठी व राजकीय पुढाऱ्यांनी स्वतःच्या स्वाथार्साठी निसगार्ची पुर्णतः राखरांगोळी केली आहे.याचे पडसाद फक्त निसर्गावरच नाही तर मानव पशुपक्षी व संपूर्ण पृथ्वीतलावरील जीवजंतूवर होणारच सोबतच देशातील प्रत्येक व्यक्तीचे आर्थिक संतुलन बिघडण्यास सुरूवात झाली आहे.आज देशाच्या १४५ कोटी जनतेच्या पोटाची खळगी भरणारा शेतकरी अत्यंत संकटात सापडलेला आहे अशा परिस्थितीत राज्य सरकार असो अथवा केंद्र सरकार असो यांनी कर्जमाफी,सातबारा कोरा, विजेचे बिल माफ, पाण्याचे बिल माफ,बँकांना कर्ज वसुलीसाठी धमकावले हे नाटक सरकारने बंद करावे व जाहीर करावे की आम्ही सवोतीपरी आर्थिक मदत करू व शेतकऱ्यांवर असलेले संपूर्ण कर्ज आम्ही आपल्या पैशातून कमी करू वेळ पडल्यास सरकारच्या तिजोरीतून कर्ज फेडू आणि यापुढे तुम्हाला(शेतकरी)कोणतीही अडचण भासणार नाही अशी ग्वाही सरकारने शेतकऱ्यांना द्यावी; असे झाले तर शेतकरी आपोआप समृद्ध होईल.आज सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे बेरोजगारी,महागाई याची झळ गरीब व सर्वसामान्यांना भोगावी लागते आहे.निसगार्चे संतुलन डगमगल्याने धरन,तलाव,नदीतील व जंगलातील पाणथळाच्या पाण्याची पातळी कमी होऊन जलसाठे कमी झाल्याने अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.त्यामुळे राज्यासह देशातील शेतकरी, शेतमजूर, गरीब व सर्वसामान्यांची दिवाळी अंधक्कारात असल्याचे दिसून येते. देशाला अंधक्कारातुन प्रकाशाकडे न्यायचे असेल तर ताबडतोब युध्दपातळीवर मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे अत्यंत गरजेचे असून शेतकऱ्यांना सरळ हातांनी आर्थिक व सर्वच पध्दतीने मदत केली पाहिजे. सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी वृक्षलागवड कागदावर न करता माणुसकी या नात्याने कृतीत करावी हेच दीवाळी अंकांच्या माध्यमातून सांगु इच्छितो. केंद्र व राज्य सरकारांनी विकासाच्या नावाखाली निसर्गाच्या सान्निध्यात रहाणारे शेतकरी-शेतमजूर, पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतू यांची अनपेक्षित होणारी हत्या थांबवावी व संपूर्ण लक्ष निसर्ग प्रफुल्लित करण्यावर भर द्यावा.मानव हा बुध्दीजीव प्राणी आहे याचा अर्थ असा नाही की स्वतःच्या स्वाथार्साठी निसगार्चा ह्रास करावा.त्यामुळे सावधान! अजूनही वेळ गेलेली नाही सरकारने एक वषार्साठी संपूर्ण विकासकामे थांबवून शेतकऱ्यांना सर्वतोपरी खुल्या मनाने आणि खुल्या हातांनी शेतकऱ्यांना मदत करावी व बदलत्या हवामानावर मात करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवडीचा संकल्प घ्यावा व सर्वत्र दिवाळी सण आनंदाने साजरा व्हावा.मी ईश्वर चरणी प्रार्थना करतो की, हे देवा अन्नदाता शेतकऱ्यांवर आलेले संकट दुर कर, राजकीय पुढाऱ्यांना सद्बुद्धी दे व दुष्काळामुळे निर्माण झालेली देशातील गंभीर परिस्थितीचे निराकरण कर आणि सर्वत्र सुखशांती नांदावी व निसर्ग प्रफुल्लित रहावा आणि सर्वांची दिवाळी आनंदात जावी अशी ईश्वर चरणी प्रार्थना करतो.

जय जवान जय किसान, जय हिंद!



रमेश कृष्णराव लांजेवार
स्वतंत्र पत्रकार
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

उजनीच्या अस्तित्वासाठी सर्वपक्षीय नेत्यांचा एल्गार राजकीय समीकरणांना नवी दिशा?

रोहित पवारांचा सरकारला थेट इशारा; मोहिते-पाटील, संजयमामा शिंदे, नारायण पाटील, अभिजित पाटील एकाच व्यासपीठावर

टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):- उजनी धरणाच्या पाण्यावर पहिला अधिकार शेतकरी, शेतमजूर आणि मच्छीमारांचा आहे. प्रस्तावित एआय डेटा सेंटरसाठी सहा ते सात टीएमसी पाणी लागणार असून, त्या तुलनेत स्थानिकांना जेमतेम ४०० जणांनाच रोजगार मिळणार असल्याचा दावा करीत, उजनीचे हक्काचे पाणी आणि वीज डेटा सेंटरला देणार की शेतकऱ्यांना, असा थेट सवाल आमदार रोहितदादा पवार यांनी सरकारला केला. जनतेचा विरोध असताना कोणत्याही परिस्थितीत या प्रकल्पाचे भूमिपूजन होऊ देणार नाही, असा ठाम इशाराही त्यांनी दिला. उजनी-भीमानगर येथे झालेल्या रास्ता रोको आंदोलनात ते बोलत होते. या आंदोलनात माजी आमदार संजयमामा शिंदे, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार नारायण पाटील, आमदार अभिजित पाटील यांच्यासह विविध पक्षांतील नेते एकाच व्यासपीठावर आल्याने आंदोलनाला राजकीय महत्त्व प्राप्त झाले. विशेष म्हणजे खासदार मोहिते-पाटील यांनी भाषणात चार वेळा संजयमामा शिंदे यांचे नाव घेऊन आभार मानल्याने आगामी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत नव्या राजकीय समीकरणांची जुळवाजुळव होणार का, याबाबत चर्चेला उधाण आले आहे.

पुढे बोलताना रोहित पवार म्हणाले की, उजनी धरणासाठी परिसरातील शेतकऱ्यांनी आपल्या हक्काच्या जमिनी दिल्या आहेत. त्यामुळे या धरणाचे खरे मालक शेतकरी, शेतमजूर आणि मच्छीमार बांधव आहेत. डेटा सेंटरसाठी मोठ्या प्रमाणात पाणी आणि वीज लागणार असून, त्या तुलनेत निर्माण होणारा रोजगार अत्यल्प असल्याचा दावा त्यांनी केला. एका मेगावॅटमागे साधारण ०.३ रोजगार उपलब्ध होतो, असा संदर्भ देत प्रस्तावित प्रकल्पातून जास्तीत जास्त ४०० लोकांना रोजगार मिळेल, असे ते म्हणाले. प्रकल्पासाठी वापरले जाणारे पाणी पुन्हा शेतीला, जनावरांना किंवा नागरिकांना उपलब्ध होणार नाही, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली. मोजक्या लोकांना कंत्राटी किंवा वाहतुकीची कामे मिळावीत म्हणून संपूर्ण परिसरातील जनतेच्या पाण्याचा प्रश्न धोक्यात घालणे योग्य नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली. या प्रकल्पांना परिसरातील जनतेचा पाठिंबा आहे का, असा प्रश्न उपस्थित करून त्यांनी उपस्थितांना हात वर करून विरोध दर्शविण्याचे आवाहन केले. प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात वीज लागणार असून, त्याचा परिणाम शेती आणि सर्वसामान्यांच्या वीजपुरवठ्यावर होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

सर्वपक्षीय नेते, शेतकरी संघटना, मच्छीमार आणि ग्रामस्थांनी एकजूट कायम ठेवावी, असे आवाहनही त्यांनी केले.

उजनी धरण परिसरात प्रस्तावित एआय डेटा सेंटर, अणुऊर्जा प्रकल्प, तरंगता सौरऊर्जा प्रकल्प आणि हायड्रोजन प्रकल्पांमुळे सोलापूर, पुणे आणि अहिल्यानगर जिल्ह्यांतील शेतकरी, शेतमजूर, मच्छीमार आणि सर्वसामान्य नागरिकांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिक शेतकरी आणि नागरिकांनी आंदोलनाचा एल्गार पुकारला. या आंदोलनाला आमदार रोहितदादा पवार, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, माजी मंत्री महादेव जानकर, माजी आमदार संजयमामा शिंदे, आमदार नारायण पाटील, आमदार अभिजित पाटील, प्रतापसिंह पाटील, सविता राजे भोसले, एकनाथ शिंदे गटाचे संजय कोकाटे, जयवंत जगताप यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थिती लावली. बच्चू कडू यांनी ऑनलाइन माध्यमातून आंदोलनाला पाठिंबा दिला.



धैर्यशील मोहिते-पाटलांचे चार वेळा संजयमामांचे नाव; डीसीसी बँकेच्या राजकारणात नवी जवळीक?

उजनी येथील आंदोलनात खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी आपल्या भाषणात चार वेळा संजयमामा शिंदे यांचे नाव घेऊन आभार मानल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले. आगामी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत मोहिते-पाटील आणि संजयमामा शिंदे यांची एकत्रित ताकद उभी राहिल्यास सहकार क्षेत्रातील विद्यमान राजकीय समीकरणांवर परिणाम होऊ शकतो, अशी चर्चा राजकीय कार्यकर्त्यांमध्ये सुरू आहे. बार्शीचे राऊत आणि सोलापूरचे कल्याण शेट्टी यांच्यासमोरही आव्हान निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, या संभाव्य राजकीय जवळिकीबाबत अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही.

संजयमामा शिंदेंची भूमिका ठरली लक्षवेधी; प्रकल्पग्रस्तांचा प्रश्न ऐरणीवर!

उजनी धरणासाठी जमिनी देणाऱ्या शेतकऱ्यांचे पुनर्वसन आणि नुकसानभरपाईचे प्रश्न अद्याप प्रलंबित असताना नव्या प्रकल्पांचा विचार कशासाठी, असा सवाल माजी आमदार संजयमामा शिंदे यांनी उपस्थित केला. आधी उजनी प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडवा, त्यांचे योग्य पुनर्वसन करा आणि त्यानंतर डेटा सेंटरचा विचार करा, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली. खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी भाषणात वारंवार त्यांचे नाव घेऊन आभार मानल्याने आंदोलनातील त्यांच्या भूमिकेची राजकीय वर्तुळातही चर्चा सुरू झाली आहे.



रोहित पवारांचे व्यासपीठ ठरले सर्वपक्षीय एकजुटीचे केंद्र!

उजनीच्या अस्तित्वाचा प्रश्न घेऊन रोहित पवार यांनी उभारलेल्या आंदोलनाला विविध पक्षांतील नेत्यांनी उपस्थिती लावली. विशेष म्हणजे सत्ताधारी गटातील नेतेही त्यांच्या व्यासपीठावर आल्याने या आंदोलनाला राजकीयदृष्ट्या वेगळे महत्त्व प्राप्त झाले. पक्षीय मतभेद बाजूला ठेवून उजनीच्या पाण्यासाठी एकत्र येण्याचा संदेश या उपस्थितीतून देण्यात आला. ही एकजूट केवळ उजनीच्या प्रश्नापुरती मर्यादित राहणार की आगामी राजकारणातही कायम राहणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

संजयमामा शिंदेंनी प्रकल्पग्रस्तांचा प्रश्न उपस्थित केला

माजी आमदार संजयमामा शिंदे यांनी उजनी धरणाच्या निर्मितीचा इतिहास मांडत प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारला जाब विचारला. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या पुढाकारातून उजनी धरणाची निर्मिती झाली. धरणासाठी शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी दिल्या; मात्र अनेक प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, नुकसानभरपाई आणि हक्काचे प्रश्न आजही प्रलंबित आहेत. आढावा बैठकीच्या नावाखाली बोलावून प्रत्यक्षात प्रकल्पाची तयारी आधीच करण्यात आली होती, असा आरोप त्यांनी केला. उजनीसाठी ज्यांनी त्याग केला, त्या शेतकऱ्यांचे प्रश्न आधी सोडवा, त्यांचे योग्य पुनर्वसन करा आणि त्यानंतर डेटा सेंटरचा विचार करा, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली.

नारायण पाटील, अभिजित पाटील यांचीही प्रकल्पांना विरोधाची भूमिका

आमदार नारायण पाटील यांनी उजनीचा प्रश्न हा करमाळा-माढा तालुक्यातील जनतेच्या जीवनमरणाचा प्रश्न असल्याचे सांगितले. हजारो कुटुंबांचे जीवन उजनीच्या पाण्यावर अवलंबून असून स्थानिकांच्या भवितव्याचा विचार न करता कोणताही प्रकल्प लादू नये, असे त्यांनी स्पष्ट केले.

आमदार अभिजित पाटील यांनी एप्रिल महिन्यात प्रकल्पासंदर्भात करार झाल्याचा उल्लेख करत स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता मंजुरीची प्रक्रिया कशी राबविण्यात आली, असा सवाल केला. उजनी परिसरात देश-विदेशातील दुर्मीळ पक्षी वास्तव्यास येतात. मोरांसह वन्यजीवांचा नैसर्गिक अधिवास आणि जैवविविधता जपली पाहिजे. सात वर्षांच्या बांधकाम काळात स्थानिक तरुणांना नेमका किती रोजगार मिळणार, याचे उत्तरही सरकारने द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.

उजनी धरणाची ग्रॉस क्षमता ११७.२५ टीएमसी असली, तरी सांगोला उपसा सिंचन योजना, वडापूर येथील भीमा-सीना जोड कालवा आणि जिल्ह्यातील इतर सिंचन योजनांचे नियोजन झाल्यानंतर प्रत्यक्षात किती पाणी शिल्लक राहणार, याचा सरकारने आधी हिशेब द्यावा, असे अभिजित पाटील यांनी सांगितले. अनेक गावे अद्याप सिंचनापासून वंचित आहेत. जानेवारीतच पाण्याची टंचाई निर्माण होत असेल, तर नवीन प्रकल्पांना पाणी कुठून देणार, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. उजनीच्या पाण्यावर पहिला अधिकार शेतकरी, शेतमजूर आणि मच्छीमारांचाच असल्याची भूमिका आंदोलनातून मांडण्यात आली.

धैर्यशील मोहिते-पाटलांनी चार वेळा घेतले संजयमामांचे नाव; राजकीय चर्चेला उधाण

या आंदोलनाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे वेगवेगळ्या राजकीय पक्षांतील नेत्यांनी पक्षीय मतभेद बाजूला ठेवून एकाच व्यासपीठावर उपस्थिती लावली. विशेषतः रोहित पवार यांच्या व्यासपीठावर सत्ताधारी गटातील नेत्यांची उपस्थिती आणि त्यांच्या भाषणातील राजकीय संदर्भ यामुळे आगामी काळातील जिल्ह्याच्या राजकारणाबाबत तर्कवितर्क सुरू झाले आहेत. गेल्या काही दिवसांपासून रोहित पवार यांच्याबाबत वेगळी भूमिका मांडल्याची चर्चा असलेले आमदार अभिजित पाटील या आंदोलनात सहभागी झाल्याने त्यांच्या भूमिकेकडेही राजकीय वतुर्ळाचे लक्ष लागले होते. त्यांनी सत्ताधाऱ्यांच्या विरोधात भूमिका मांडत आंदोलनाला पाठिंबा दिला.

दरम्यान, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी भाषणातून चार वेळा संजयमामा शिंदे यांचे नाव घेऊन आभार मानल्याने दोन्ही नेत्यांमधील राजकीय जवळिकीची चर्चा सुरू झाली आहे. आगामी डीसीसी बँकेच्या निवडणुकीत मोहिते-पाटील आणि संजयमामा शिंदे यांची एकत्रित ताकद उभी राहिल्यास बार्शीचे राऊत आणि सोलापूरचे कल्याण शेट्टी यांच्यासमोर आव्हान निर्माण होऊ शकते, अशी चर्चा राजकीय कार्यकर्त्यांमध्ये रंगू लागली आहे. मात्र, या संभाव्य राजकीय समीकरणाबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही.

वाहतूक वळवून पोलिसांचे नियोजन; आंदोलन शांततेत पार

रास्ता रोको आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर टेंभुर्णी पोलीस ठाणे आणि पोलीस प्रशासनाने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी सकाळी दहा वाजल्यापासूनच वाहतुकीचे नियोजन केले होते.

सोलापूरकडून येणारी वाहने टेंभुर्णी-अकलूज मार्गे वळविण्यात आली, तर पुण्याकडून सोलापूरकडे जाणारी वाहने इंदापूर-अकलूज-पंढरपूर मार्गे वळविण्यात आली होती. त्यामुळे आंदोलनस्थळी वाहतुकीचा ताण निर्माण झाला नाही.

सकाळी अकरा वाजता सुरू झालेला रास्ता रोको दुपारी १ वाजून ४० मिनिटांपर्यंत सुरू होता. पोलिसांच्या वाहतूक नियोजनामुळे आंदोलन शांततेत पार पडले.

एकीकडे उजनीच्या अस्तित्वासाठी शेतकऱ्यांचा लढा तीव्र होत असताना, दुसरीकडे या आंदोलनाच्या निमित्ताने जिल्ह्याच्या राजकारणातही नव्या जुळवाजुळवीचे संकेत मिळत असल्याची चर्चा सुरू झाली आहे. उजनीचा प्रश्न केवळ पाण्यापुरता मर्यादित न राहता आगामी सहकार आणि जिल्ह्याच्या राजकारणाची दिशा ठरवणारा ठरणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

पांगरीत राजमुद्रा क्रेडिट सोसायटीच्या मुख्य कार्यालयाचे थाटात उद्घाटन

वडिलांच्या शुभहस्ते फित कापून नव्या कार्यालयाचा शुभारंभ

ग्रामीण भागातील आर्थिक विकासाला बळ देण्याचा संकल्प

पांगरी (कटूसत्य वृत्त) : ग्रामीण भागातील नागरिकांना आर्थिक व्यवहारांसाठी सक्षम आणि विश्वासार्ह पर्याय उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने पांगरी येथे राजमुद्रा मल्टी-स्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लिमिटेडच्या मुख्य कार्यालयाचा भव्य उद्घाटन सोहळा सोमवार, दि. २० ऑक्टोबर २०२६ रोजी उत्साहात पार पडला.

संस्थेचे मुख्य कार्यालय पांगरी पोलीस ठाण्याच्या समोर, बार्शी रोड येथे सुरू करण्यात आले असून, संचालकांच्या वडिलांच्या शुभहस्ते या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.

पारंपरिक पद्धतीने दीपप्रज्वलन, श्रीफळ अर्पण आणि नारळ वाढवून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी पंच, मान्यवर, नागरिक आणि संस्थेशी संबंधित पदाधिकारी व संचालक मंडळ उपस्थित होते. मान्यवरांच्या उपस्थितीत हा उद्घाटन सोहळा मोठ्या थाटामाटात आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

राजमुद्रा क्रेडिट सोसायटीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना बचत, विविध प्रकारच्या ठेवी, कर्ज सुविधा तसेच महिला स्वयंसहाय्यता बचत गटांना आर्थिक पाठबळ देण्याचा संस्थेचा मानस आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, छोटे व्यावसायिक, उद्योजक आणि सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक व्यवहारांसाठी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने संस्थेचे हे पाऊल महत्त्वपूर्ण मानले जात आहे.

सहकार क्षेत्राच्या माध्यमातून सामान्य नागरिकांची आर्थिक उन्नती साधताना पारदर्शकता, विश्वासार्हता आणि ग्राहकाभिमुख सेवा यांना प्राधान्य देणार असल्याचा निर्धार संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. पांगरीसह परिसरातील नागरिकांना संस्थेच्या माध्यमातून आर्थिक सुविधा उपलब्ध होतील, असा विश्वास यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.



राजमुद्रा संस्थेचे पदाधिकारी व संचालक मंडळ

- राहुल अंबरशी पवार – अध्यक्ष
- स्वाती विनायक जाधव – उपाध्यक्ष
- सुहास श्रीराम चव्हाण – खजिनदार
- विनायक बिभीषण गराड –संचालक
- श्वेता शैलेश सदाफुले – संचालिका
- कोमल प्रवीण पाटील – सचिव
- अमरसिंह देशमुख – मार्गदर्शक



राजमुद्रा क्रेडिट सोसायटीचा उद्घाटन सोहळा वडिलांच्या शुभहस्ते संपन्न

पांगरी येथे मुख्य कार्यालयाचे थाटात उद्घाटन

वडिलांच्या आशीवार्दाने संस्थेचा शुभारंभ!

संस्थापकांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, सामान्य नागरिकांच्या आर्थिक उन्नतीसाठी पारदर्शक, विश्वासार्ह आणि सेवाभावी सहकार चळवळ उभारणे हेच संस्थेचे प्रमुख ध्येय आहे. वडिलांच्या आशीवार्दाने आज संस्थेच्या मुख्य कार्यालयाचा शुभारंभ होत असून, शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य नागरिकांचा विश्वास संपादन करून संस्थेच्या माध्यमातून उत्तम आर्थिक सेवा देण्याचा आमचा प्रयत्न राहील.

श्री सिद्धेश्वर प्रशाला साखर कारखाना कुमठेच्या मुलींच्या बेसबॉल संघास विजेतेपद

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर महानगरपालिका व जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झालेल्या 17 वर्षे वयोगट शहर स्तरीय बेसबॉल स्पर्धेत श्री सिद्धेश्वर प्रशालेच्या मुलींचा संघ विजेता ठरला.

सदर संघाचे कर्णधारपद जबीन मुल्ला हिच्याकडे होते धनश्री हिरेमठ, प्राची सुंकद, मोहिनी सोनकडे, प्रणिती गाडेकर, अक्षता कामशेट्टी, आकांशा कामशेट्टी, राधिका शिवशरण, पूजा रामशेट्टी, मनस्वी जाधव, कोमल जडगे, आनंदी ढोणे, श्रेया होनराव, विद्या बिराजदार, सारिका कोरे, वैष्णवी स्वामी या मुलींच्या संघाने ही कामगिरी केली.



या घवघवीत यशाबद्दल यशस्वी खेळाडू व त्यांचे मार्गदर्शक क्रीडा शिक्षक सिताराम भांड यांचे श्री सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे मार्गदर्शक संचालक तथा शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष धर्मराज काडादी, श्री सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अण्णाराज काडादी, शालेय शिक्षण समितीचे सदस्य सिद्धाराम चाकोते, गुरुराज माळगे, शिवशंकर बिराजदार, महादेव अथणी श्री सिद्धेश्वर शिक्षण संकुलाचे समन्वयक संतोष पाटील, प्रशालेचे मुख्याध्यापक काशिनाथ आकाशे व प्रशालेतील सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.

जाहीर प्रसिध्दीकरण

क्रि.कि. अर्ज क्रं. ३७१/२०२६
निशाणी:०४

करमाळा येथील मे. ज्यु. मॅ. वर्ग-१ सो. यांचे कोर्टात.

अफरोज अफजल पठाण } अर्जदार

विरूध्द

मा. मुख्याधिकारी सो.
करमाळा नगर परिषद, करमाळा
ता. करमाळा, जि. सोलापूर. } सामनेवाला

यात अर्जदार तर्फे जाहिर प्रकटन

यातील अर्जदार यांचे वडील अफजल पठाण व आई यांचे विवाह संबंधातुन अर्जदार यांचा जन्म दिनांक- ०१/०६/१९८३ रोजी करमाळा, ता. करमाळा, जि सोलापूर येथे झालेला आहे. अर्जदार यांचे जन्माबाबतची नोंद करमाळा नगर परिषद येथे झालेला नाही. त्यामुळे अर्जदार यांचे जन्म घटनेची नोंद जन्म - मृत्युचे रजिष्ट्रला घेणेकामी मे. कोर्टाचा योग्य तो आदेश मिळणेकामी अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज मे. कोर्टात आणलेला आहे. तरी अर्जदार यांचे जन्माची नोंद करमाळा नगर परिषद यांचे रजिष्ट्रला धरणेकामी कोणाची हरकत अगर तक्रार असल्यास दि.०८/०१/२०२७ रोजी सकाळी ११-०० वाजता किंवा ३० दिवसाचे आत स्वतः अगर वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे सादर करावे. अगर कोणीही हजर न राहिल्यास मे. कोर्ट कोणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार नाही, म्हणून योग्य तो हुकूम करतील कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून सदरची जाहिर नोटीस दिली असे.

आज दि. ०२/११/२०२६ रोजी आमचे सही व न्यायालयाचे सही शिक्क्यानिशी दिली.

हुकुमावरुन
सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय, करमाळा

(क. लिपीक) शिक्का

वैराग नगरपंचायत, वैराग

स्थापना १८/०५/२०२१ ता.बार्शी जि.सोलापूर Email- comcvairag1@gmail.com

आज़ादी का अमृत महोत्सव

जा.क्र.न.पं./२११८/२०२६ दि-०२/११/२०२६

वैराग नगरपंचायत वैराग

निविदा प्रसिद्धीकरण सुचना पहिली वेळ

१. वैराग नगरपंचायत करिता पाणीपुरवठा विभागाकडील पाईपलाईन साहित्य व दुरुस्ती साहित्य पुरविणे.

वैराग नगरपंचायत वैराग

निविदा प्रसिद्धीकरण सुचना दुसरी वेळ

१. वैराग नगरपंचायत पाणीपुरवठा विभागाकडील विविध ठिकाणच्या स्क्रॅप वायर परत न करता मोटारी काढणे/दुरुस्ती (Rewinding) करणे व बसवून चाचणी देणे.
२. संगणक विभागाकडे लागणारे स्टेशनरी व साहित्य खरेदी व देखभाल दुरुस्ती करणे.

वैराग नगरपंचायत वैराग

निविदा प्रसिद्धीकरण सुचना चौथी वेळ

१. नगरपंचायत वैराग कडील योजना सन २०२६-२७ ते २०२८-२९ या तीन आर्थिक वर्षात विविध प्रकारचे कामाचे डीपीआर तयार करणे. प्रकल्प व्यवस्थापन (आर्कीटेक) सल्लागार नियुक्ती करणे.
२. वैराग नगरपंचायत पाणीपुरवठा विभागाकडील हातपंपसाठी साहित्य पुरविणे.
३. वैराग नगरपंचायत पाणीपुरवठा विभागाकडील हातपंप दुरुस्तीसाठी मजुरी देणे.
४. वैराग नगरपंचायत लेखा विभागाकडील शासकीय कराचे भरणा भरणेकामी चार्टड अकाऊंटन नेमणे.

वैराग नगरपंचायत वैराग

निविदा प्रसिद्धीकरण सुचना पाचवी वेळ

१. वैराग नगरपंचायत हद्दीतील एनिमल वेलफेअर बोर्डाच्या नियमावलीप्रमाणे मोकाट व भटकी कुत्री पकडून त्यांचे निर्बीजकरण करणे.
२. आरोग्य विभागाकडील सर्व घंटागाडी, ट्रॅक्टर व सक्शन वाहन यांना ऋझड खरेदी करणे व बसविणेकामी दरपत्रक मागविणे.

वरील विषयांकित दरपत्रक/निविदेच्या अटी व सविस्तर निविदा सूचना तसेच अटी व शर्ती नगरपंचायत कार्यालयाकडील संबंधित विभागाकडे दि.०३/११/२०२६ ते दि.१६/११/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत.

सही/-
(शशिकांत भोसले)
मुख्याधिकारी
वैराग नगरपंचायत वैराग

सोलापूर महानगरपालिका,सोलापूर

'इंद्रभुवनङ्ग पुण्यश्लोक अण्णासाहेब वारद पथ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापुर - ४१३००१

महिला व बाल कल्याण समिती विभाग

जाहीर आवाहन

सोलापूर महानगरपालिका महिला व बाल कल्याण समिती विभागामार्फत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये महिला व मुलींसाठी स्थानिक प्रशिक्षण संस्थेमार्फत (लेखी व मैदानी) पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण देणे ही योजना राबविण्यात येणार आहे.

अ.क्र.	प्रशिक्षणाचे नांव	किमान शैक्षणिक पात्रता व अर्हता	वय वर्षे	उत्पन्न (शिधापत्रिका)
१	पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण देणे. स्थानिक प्रशिक्षण संस्थेमार्फत (लेखी व मैदानी)	१२ वी पास	१८ ते ३३	पिवळे/ केशरी

सदर प्रशिक्षण घेणेकामी वर नमुद शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा धारण करणाऱ्या गरजू मुली व महिला या प्रशिक्षणाचा लाभ घेऊ शकतात त्यानी www.solapurmuncipalcorporation.gov.in या संकेतस्थळावर दिनांक. ०३/११/२०२६ ते दिनांक. १६/११/२०२६ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारले जातील तसेच ऑनलाईन फॉर्म भरून पोहोचसह सोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती महिला व बाल कल्याण कार्यालयात जमा केलेल्या अर्जांचाच विचार प्राधान्याने होईल.

प्रशिक्षणार्थीसाठी पात्रता व अटी खालीलप्रमाणे राहतील.

१. एकल महिला तसेच एकल महिलांच्या पाल्यांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.
२. पोलिस भरतीसाठी शैक्षणिक पात्रता व शारिरिक दृष्ट्या पात्र असलेल्या अर्जदारांनीच अर्ज भरावेत. ३. लाभार्थी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील रहिवासी असणे आवश्यक आहे. त्यासाठी आधार कार्ड/रहिवासी पुरावा सादर करणे आवश्यक राहील.
४. महाराष्ट्र शासनाच्या सेवक भरती नियमानुसार सदर प्रशिक्षणासाठी वयोमर्यादा असेल याची नोंद घ्यावी मागील ३ (तीन) वर्षांत लाभार्थीने सो.म.पा महिला व म.बा.क समितीमार्फत राबविण्यात आलेल्या कोणत्याही प्रशिक्षणाचा लाभ घेतलेला नसावा.
५. लाभार्थीने अर्जासोबत पात्रते बाबतचे सर्व कागदपत्रे १). आधार कार्ड, २). जन्म दाखला / शाळा सोडल्याचा दाखला, ३). पॅन कार्ड (लागू असल्यास), ४). रेशन कार्ड (पिवळे/केशरी), ६) पासपोर्ट आकाराचे २ छायाचित्रे व स्वयंघोषणापत्र इत्यादी कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे.
६. पात्र लाभार्थ्यांना प्रशिक्षणाचे ठिकाण, वेळापत्रक व इतर आवश्यक सूचना स्वतंत्रपणे कळिवण्यात येईल.

टीप : प्रवेश संख्या मर्यादित असल्याने प्रथम येणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात येईल.

सही/-
सहा. आयुक्त तथा नियंत्रण अधिकारी
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

दुष्काळग्रस्तांच्या मागण्यांसाठी विविध संघटनांचा पुढाकार

वीजबिल व कर्जवसुली थांबविण्यासह शेतकरी, शेतमजुरांना आर्थिक मदतीची मागणी



करमाळा (कटूसत्य वृत्त):- दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकरी, शेतमजूर, भूमिहीन आणि ग्रामीण भागातील दुर्बल घटकांना तातडीने दिलासा मिळावा, यासाठी महाराष्ट्र दुष्काळ निवारण व निर्मूलन समिती, राज्यस्तरीय कृती समिती व विविध संघटनांच्या वतीने १९ मागण्यांचे निवेदन तहसीलदारांना देण्यात आले. दुष्काळग्रस्त कुटुंबांना पुढील सहा महिने दरमहा १५ हजार रुपये आर्थिक मदत द्यावी, शेतकऱ्यांची वीजबिल वसुली आणि कर्जवसुलीला स्थगिती द्यावी, रोजगार हमीची कामे सुरू करावीत, जनावरांसाठी चारा व पाण्याची व्यवस्था करावी, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करावे, तसेच महिला बचतगट, मच्छिमार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी विशेष उपाययोजना कराव्यात, उजनीवर प्रस्तावित असलेले ए आय देटा सेन्टरसारखे प्रकल्प त्वरित रद करावेत अशा प्रमुख मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

यावेळी ॲड. सविता शिंदे, उत्तरेश्वर कांबळे, राजाभाऊ कदम, शँकर कुलकर्णी, डॉ. जयंत कापडी, रशीद शेख, सुभाष ओहोळ, दीपक घोडकूस, संतोष कुलकर्णी, ॲड. कोमल गोरे, ॲड. स्वाती सपकाळ इ. हजर होते. नायब तहसीलदार श्री. लोकरे यांनी निवेदन स्विकारले.

यावेळी ॲड. सविता शिंदे म्हणाल्या की, दुष्काळ म्हणजे केवळ पाण्याचा प्रश्न नसून तो ग्रामीण अर्थव्यवस्था, रोजगार, शिक्षण आणि अन्नसुरक्षेशी संबंधित गंभीर प्रश्न आहे. त्यामुळे शासनाने तात्पुरत्या उपाययोजनांपुरते मर्यादित न राहता गावनिहाय दुष्काळ निवारण आराखडा तयार करून तातडीने अंमलबजावणी करावी. तसेच निवेदनावर १५ दिवसांत कार्यवाही करून अहवाल द्यावा, अशी मागणी ही यावेळी करण्यात आली.

आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.

मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर

संपर्क - 9422602337, 8317212037

Classified - छोटी जाहीरात

बोअरवेल

सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
9420766666

(सरकार मान्य)

अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

वर-वधू




जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
उमेश माने
मो. 9353370779
रेखा बर्वे
मो. 7218370779

वाचकांसाठी निवेदन: या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

कटूसत्य शब्दकोडे



उभे शब्द : १) शहर २) पैसे लावून खेळला जाणारा सट्ट्याचा खेळ ३) दृष्टी ४) मनातील विचार ५) एक म्हण-गाव करील ते ** काय करील ६) पटकन, त्वरेने ८) सातारा जिल्ह्यातील एक तालुका ९) मंत्री महोदयांच्या नावापुढे येणारे विशेषण ११) जेवल्यानंतर मुखशुध्दीसाठी ही खातात १४) श्वसनेंद्रिय १५) श्रीगणेशाची मंगळवारी येणारी चतुर्थी १६) देवाचे सततचे केलेले नामस्मरण १८) रायगडचे खासदार - सुनील **** १९) फॅक्टरी (मराठीत) २०) माफ करणे २१) स्व. आर.आर.पाटील यांचा विधानसभा मतदारसंघ २३) पंधरा दुणे २५) लग्नमंडपातील वधू मुलगी २७) सोने चांदीचे दागिने विक्री करणारा २९) समुद्र, रत्नाकर, मुलाचे एक नाव ३०) पाठीच्या कण्याचे शेवटचे टोक हाडाच्या या भागाला जोडले जाते ३२)श्रीगणेशाचे एक नाव ३४) महाराष्ट्रातील एक जिल्हा ३६) टेकडी (हिंदीत) ३८) वय उलट लिहा ४१) मुंबईतील या भागात दूरदर्शनचे मुख्य केंद्र आहे ४२) दरवाजा ४४) मग्न, लीन ४६) चेष्टा मस्करी करणे, ** उडविणे

आडवे शब्द : १) दशरथ मांझी यांची भूमिका करणारा हिंदी चित्रपटातील अभिनेता-***** सिद्दीकी ४) सोलापूर जिल्ह्यातील एक तालुका, ढामा उलट लिहा ५) या लढाऊ विमान खरेदीवरून भाजपवर आरोप झाले होते ७) जय *** जय किसान ९) एक म्हण-** मोठे लक्षण खोटे १०) ताणला जाणारा लवचिक पदार्थ १२) श्रीमंत (हिंदीत) १३) छ. शिवरायांचा एक सरदार- येसाजी ** १५) एखाद्या गोष्टीविषयी व्यक्त केलेले अनुमान १७) शेकाप पक्ष संपूर्ण शब्दात लिहा २१) रागीट, लगेच क्रोध येणारा २२) एक म्हण- अति तेथे ** २४) मित्र, सोबती २६) शर्यत (इंग्रजीत), सैफ अली खान अभिनीत एक चित्रपट २८) अंतराळ संशोधन करणारी अमेरिकेतील प्रख्यात संस्था ३०) आईची बहीण ३१) तमाशातील नाट्यप्रकार ३३) मनसे अध्यक्षांचे फक्त नाव ३५) भाजपचे केंद्रीय मंत्री-नितीन **** ३७) आयुर्वेदिक औषधांमध्ये वापरतात ते एक प्रकारचे फळ ३९) पुष्कळ, भरमसाठ ४०) एक म्हण-मनी नाही भाव अन् देवा मला ** ४२) राक्षस ४३) थंड, शीत ४५) विहिरीतून पाणी खेचण्याचे चक्राकार साधन ४७) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) ४८) पतीची दुसरी बायको ४९) वाघ सिंहाचे जोराचे ओरडणे

सुडोकु - 90

		4	3					1
		7		9	1	2	4	
1	9			4		8		
7		9	2			5		6
		2		5			3	
				7	6	9	1	2
4		5		8				
2	7					1	5	8
			6	2	5	3	7	

दत्तकला शिक्षण संस्थेत डीबीएटीयू पुणे झोनच्या मैदानी क्रीडा स्पर्धांचा उत्साहात थरार !

स्वामी-चिंचोली (कटूसत्य वृत्त) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (डीबीएटीयू), लोणेरे यांच्या मान्यतेने आयोजित करण्यात आलेल्या डीबीएटीयू पुणे झोन आंतरमहाविद्यालयीन मैदानी क्रीडा स्पर्धा २०२६-२७ दत्तकला शिक्षण संस्थेच्या दत्तकला इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्स अँड रिसर्च, स्वामी-चिंचोली (भिगवण) येथे बुधवार, दि. २८ ऑक्टोबर रोजी मोठ्या उत्साहात आणि क्रीडामय वातावरणात पार पडल्या. या स्पर्धांमध्ये पुणे झोनमधील विविध महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या क्रीडा कौशल्याची चमक दाखविली.



या स्पर्धेत धावणे, उडी आणि थ्रो अशा विविध मैदानी क्रीडा प्रकारांचा समावेश होता. प्रत्येक स्पर्धेत खेळाडूंनी शारीरिक क्षमता, वेग, चपळता, अचूकता आणि जिद्दीच्या जोरावर उत्कृष्ट कामगिरी केली. विजयासाठीची चुरस, खेळाडूंमधील खिलाडूवृत्ती आणि सहकाऱ्यांना प्रोत्साहन देणारा उत्साह यामुळे संपूर्ण क्रीडांगणावर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे या स्पर्धांना विशेष रंगत आली.

स्पर्धेचे उद्घाटन दत्तकला शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापन सदस्या जयमाला बांदल आणि डीबीएटीयू पुणे झोनचे क्रीडा समन्वयक तथा सचिव एच. पी. नरसुदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये क्रीडाक्षेत्राचे महत्त्व अधोरेखित केले. केवळ शैक्षणिक गुणवत्ता प्राप्त करणे पुरेसे नसून विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रातही आपले कौशल्य विकसित करणे आवश्यक आहे. खेळामुळे शिस्त, संघभावना, नेतृत्वगुण, निर्णयक्षमता आणि आत्मविश्वास वाढण्यास मदत होते. तसेच शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक सक्षमताही निर्माण होते, असे मत त्यांनी व्यक्त केले. याप्रसंगी दत्तकला शिक्षण संस्थेच्या फार्मसी महाविद्यालयांचे प्राचार्य डॉ. श्रीकांत कुमार आणि डॉ. ज्योती जवळे तसेच दत्तकला स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या सिंधू यादव यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी स्पर्धक विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत त्यांच्या क्रीडा कौशल्याचे कौतुक केले.

स्पर्धा निष्पक्ष, पारदर्शक आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडाव्यात यासाठी महाराष्ट्र ॲथलेटिक्स असोसिएशन आणि इंग्लिश मीडियम स्टुडंट्स स्पोर्ट्स असोसिएशन, महाराष्ट्र यांच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आलेल्या पात्र पंचांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. प्रत्येक क्रीडा प्रकाराचे नियमांनुसार संचालन करण्यात आले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडा विभागाचे प्रमुख ललित लोखंडे आणि सौरभ बोराटे यांनी विशेष नियोजन व समन्वय साधला.

या स्पर्धांच्या आयोजनासाठी संस्थेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, आयोजन समिती आणि सहायक कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

स्पर्धेच्या माध्यमातून विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना आपले कौशल्य सादर करण्याची, एकमेकांशी संवाद साधण्याची आणि क्रीडा क्षेत्रातील अनुभवांची देवाणघेवाण करण्याची संधी उपलब्ध झाली. स्पर्धेच्या समारोपप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी सहभागी खेळाडूंचे अभिनंदन केले.

तसेच विजेत्या आणि उपविजेत्या खेळाडूंना पुढील क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच क्रीडा, शारीरिक तंदुरुस्ती आणि व्यक्तिमत्त्व विकासाला प्राधान्य देण्याची दत्तकला शिक्षण संस्थेची भूमिका या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनातून पुन्हा एकदा अधोरेखित झाली.

सिंहगड पब्लिक स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात संपन्न

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा क्षेत्राचे महत्त्व अधोरेखित करणारा सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, केगाव, सोलापूर येथील वार्षिक क्रीडा महोत्सव ३१ ऑक्टोबर रोजी उत्साहात संपन्न झाला. विद्यार्थ्यांसह पालकांनीही विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविल्याने मैदानावर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे डॉ. एस. एच. पवार (संचालक, सीआरटीडी, सिंहगड इन्स्टिट्यूट, केगाव) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सन्माननीय अतिथी म्हणून सिंहगड इन्स्टिट्यूटचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते क्रीडाज्योत प्रज्वलित करून स्पर्धांना प्रारंभ करण्यात आला.



या महोत्सवात पूर्वप्राथमिक विभागापासून कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरापर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी वयोगटानुसार विविध मैदानी खेळ, मनोरंजक स्पर्धा आणि क्रीडा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्या क्रीडागुणांचे प्रदर्शन केले.

महोत्सवाचे विशेष आकर्षण ठरले ते पालकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या मनोरंजक क्रीडा स्पर्धा. महिला व पुरुष पालकांनी मोठ्या उत्साहाने विविध खेळांमध्ये सहभाग घेतला. पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि विद्यार्थ्यांचा जल्लोष यामुळे संपूर्ण कार्यक्रम अधिक रंगतदार झाला. या उपक्रमातून शाळा आणि पालक यांच्यातील सुसंवाद व सहकार्याचे दर्शन घडले.

यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. एस. एच. पवार यांनी विद्यार्थ्यांच्या जीवनातील खेळांचे महत्त्व स्पष्ट करताना, क्रीडेमुळे शारीरिक व मानसिक विकासासोबतच शिस्त, संयम, निर्णयक्षमता आणि संघभावना विकसित होते, असे सांगितले.

सन्माननीय अतिथी संजय नवले यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही प्रगती करण्याचे आवाहन केले. विजयाइतकेच सहभाग, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि खिलाडूवृत्ती महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले. स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांचे तसेच सहभागी खेळाडूंचे मान्यवरांनी कौतुक केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राचार्या सौ. शाहीन शेख, उपप्राचार्य श्री. प्रकाश नवले, उपप्राचार्या सौ. निकहत शेख, क्रीडा शिक्षक, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. पालकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. मयूरी भोसले व कु. पलक मीणा यांनी केले.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर उपळवटे गावात फायनान्स व मायक्रोफायनान्स वसुलीदारांना प्रवेशबंदी!

करमाळा (कटूसत्य वृत्त):- राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी, सर्वसामान्य नागरिक आणि महिला आर्थिक संकटात सापडले आहेत. अशा कठीण परिस्थितीत फायनान्स व मायक्रोफायनान्स कंपन्यांच्या वसुली प्रतिनिधींकडून कर्जवसुलीसाठी नागरिकांवर दबाव टाकणे, घरोघरी जाऊन तगादा लावणे आणि मानसिक त्रास देण्याचे प्रकार सहन केले जाणार नाहीत, असा ठाम पवित्रा जनशक्ती शेतकरी संघटनेने घेतला आहे. याच पार्श्वभूमीवर करमाळा विधानसभा मतदारसंघातील उपळवटे गावात फायनान्स व मायक्रोफायनान्स कंपन्यांच्या वसुलीदारांना प्रवेशबंदी करण्यात आल्याचा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे. दुष्काळामुळे आधीच शेतकरी



आणि सामान्य नागरिक आर्थिक संकटाचा सामना करत असताना कर्जाच्या वसुलीसाठी होणारा तगादा अन्यायकारक असल्याची भूमिका संघटनेने मांडली आहे.

संकटात सापडलेल्या जनतेला दिलासा देण्याऐवजी वसुलीच्या नावाखाली त्रास देऊ नये, असे आवाहनही करण्यात आले आहे. 'संकटात सापडलेल्या जनतेला दिलासा द्या; वसुलीच्या नावाखाली त्रास देऊ नका!' असा स्पष्ट संदेश जनशक्ती शेतकरी संघटनेने दिला आहे.

उपळवटे गावात लावलेल्या बॅनरवर

उपळवटे गावात प्रवेश बंदी
फायनान्स व मायक्रो
फायनान्सच्या वसुलीदारांना
उपळवटे गावात प्रवेश बंदी..!

दुष्काळाने शेतकरी-शेतमजूर हवालदिल; कर्जवसुलीचा तगादा आता सहन करणार नाही..!प्रवेश बंद आहे! राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे सर्वसामान्य नागरिक, शेतकरी व महिला आर्थिक संकटात सापडले आहेत. अशा परिस्थितीत कर्जवसुलीसाठी घरोघरी जाऊन तगादा लावणे, दबाव टाकणे व मानसिक त्रास देणे खपवून घेतले जाणार नाही.

संकटात सापडलेल्या जनतेला दिलासा द्या; वसुलीच्या नावाखाली त्रास देऊ नका!

जनशक्ती शेतकरी संघटना संस्थापक अध्यक्षः- अतुल खुपसे पाटील अशा आशयाचा बॅनरवर मजकूर आहे

जनशक्ती शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अतुल खुपसे पाटील यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आलेल्या या भूमिकेमुळे उपळवटे गावातील कर्जवसुलीचा मुद्दा चर्चेत आला आहे.

अकलूज येथे सरदार वल्लभभाई पटेल यांचे जयंतीनिमित्त एकता दौडचे आयोजन

अकलूज (कटूसत्य वृत्त):- अकलूज पोलीस स्टेशनच्या वतीने भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त एकता दौडचे आयोजन करण्यात आले होते.या दौडमध्ये सामान्य नागरिक, पोलीस अधिकारी,पोलीस अंमलदार व अकॅडमीचे विद्यार्थी सहभागी झाले होते. सोलापूर ग्रामीण पोलीस दला अंतर्गत अकलूज पोलीस स्टेशनच्या वतीने सरदार वलभभाई पटेल यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त आयोजित राष्ट्रीय एकता दिवस अभियानांतर्गत एकता दौड आयोजन करण्यात आले



होते.अकलूज पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक निरज उबाळे यांनी झेंडा दाखवून या दौड सुरुवात करण्यात आली.ही दौड विजयसिंह मोहिते-पाटील क्रिडा संकुल येथून सुरुवात करून महर्षी चौक,सदुभाऊ चौक, प्रतापसिंह चौक, सुजयनगर, अकलूज पोलीस स्टेशन येथे समारोप करण्यात आली. यावेळी पोलीस उपनिरीक्षक प्रमोद दिक्षित यांनी राष्ट्रीय एकता व अखंडतेचा संदेश जनसामान्यासाठी पोहोचविण्या साठी राष्ट्रीय एकतेची शपथ घेण्यात आली. यावेळी पोलीस सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक विक्रम साळुंखे, पोलिस अमलदार शिवकुमार मदभावी, बबलू गाडे, प्रवीण काळे, भाऊसाहेब मार्कड, तात्यासाहेब ठोंबरे, पंडित गवळी, अमोल बकाल, समीर पठाण आदी उपस्थित होते.

खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेण्याबाबत

जाहीर नोटीस

मौजे, टाकळी ता. पंढरपूर, जि. सोलापूर या पंचक्रोशीतील तमाम लोकांना, सरकारी कार्यालये व निमसरकारी कार्यालये, वित्तीय संस्था, पतसंस्था, यांना ह्या जाहीर नोटिसीने कळविणेत येते की, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पंढरपूर यांनी मौजे टाकळी, ता.पंढरपूर, जि.सोलापूर येथील जमीन प्रस्तावित ''टाकळी- कासेगांव-अनवली प्र.जि.म. ८३ या रस्तायावर किमी १/४०० वर कूडूवाडी-मिरज सेक्शन अंतर्गत पंढरपूर-सांगोला लाईनवर किमी ४३१/ ७-८ वर (LC-२४) येथे रेल्वे उड्डाण पुलाचे बांधकामाकरीता'' या सार्वजनिक प्रयोजनाकरिता शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण-०३/२०१५/प्र. क्र. ३४/१-२ दिनांक १२ में २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ मधील तरतुदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर यांचे नावे होण्याबाबतचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडील जा. क. २०२३/भूसं/कार्या-१/आरआर/७४/२०२३ दि. १२/०१/२०२४ अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी उक्त शासन निर्णय परिपत्रक, दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ आणि तदनुषंगीक शासन निर्णय तसेच शासन परिपत्रक, महसुल व वन विभाग क्र. एलक्यूएन-०१/२०१७प्र.क्र. १२/अ-२, दिनांक २५ जानेवारी २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश प्राप्त आहेत.

आणि ज्याअर्थी, या कार्यालयाने दि. १३/०१/२०२५चे जाहीर सुचना प्रसिध्द केली होती, तथापी उपव्यवस्थापक-जमीन महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि. यांनी सदरच्या अलाईनमेंट बदल करणेचा असल्याने पूर्वीची नोटीस रद्द करणेत येत आहे. व या जाहीर नोटीशीद्वारे नवीन अलाईनमेंटअन्वये प्रसिध्द करणेत येत आहे.

त्याअर्थी, उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार या नोटिसीद्वारे, (एक) अनुसूची एकमध्ये नमुद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर यांचे नावे करण्याच्या अनुषंगाने जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे आणि (दोन) अनुसूची-एक मधील स्तंभ ४ मध्ये नमुद संबंधीत भूधारकांकडुन शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर यांचे नावे खरेदी देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतचे संमंतीपत्रे (विकल्प) मागवित आहे.

प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समिती मार्फत भूमिसंपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याच्या आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेड्डुल - १ च्या तरतुदीनुसार संबंधीत जमीनींसाठी परिगणीत होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रक्कमेवर २५% रक्कम वाढीव देवुन मोबदला निश्चित करण्यात येईल.

संबंधीत भूधारकांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमती पत्रे (विकल्प) तसेच उपरोक्त बाबत कोणाचेही काही हरकत असल्यास तशी लेखी हरकत आवश्यक त्या कागदपत्रासह उपविभागीय अधिकारी पंढरपूर विभाग पंढरपूर,जि.सोलापूर यांचेकडे समक्ष ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन१५दिवसांच्या आत कार्यालयीन वेळेत दाखल करावीत.

संमतीपत्राचा (विकल्प) विहीत नमुना उपविभागीय अधिकारी पंढरपूर विभाग पंढरपूर जि. सोलापूर/कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच नमुना या कार्यालयामार्फत / सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यां मार्फत भूधारकांस उपलब्ध करुन देण्यात येईल.

सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपविभागीय अधिकारी पंढरपूर विभाग पंढरपूर / कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर यांच्या कार्यालयामधील कार्यलयोन वेळेत भूधारकांना किंवा हित संबंधीत व्यक्तींना तसेच जनतेस निरिक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहेत.

अनुसूची एक

संपादन क्षेत्राच्या खरेदी घ्यावयाच्या जमिनीचा तपशिल

अ. क्र.	गावाचे नाव	खातेदाराचे नाव	गट क्र.	क्षेत्र (चौ.मी.)
१	टाकळी	चंद्रकांत गोविंद साबळे व इतर मोहन लक्ष्मण आयरे, सरस्वती युवराज देठे, सुमन शामराव आटकळे, छबूर्बा भिमराव सातपुते, कुसुम निवृत्ती आवट, चंद्रकांत गोविंद साबळे, शहाजी नामदेव पाटील, सदाशिव महादेव भोसले, शोभा अनिल बोरावके, पांडूरंग किरणसुर मादेगौडा, अरुणा विजय गारुळे, अनुप विजय गारुळ, अभिमान विजय गारुळे, विष्णु साधू खेरे, सुधीर दत्तात्रय चिंतामणी, प्रदिप महादेव पालवे, दिलीप अंबादास जोशी, प्रशांत दिलीप जोशी, सुनंदा महादेव पालवे, महेश सुरुश मेंडगुळे, बंडू विष्णू खरे, अरुणा विजय गारुळे, संगीता रामचंद्र एखतपुरे, दादासाहेब सदाशिव भोसले, नंदा सदाशिव भोसले, नितीन शहाजीराव पाटील, सुरेश नंदकुमार मोडक, सुजाता अरविंद माने, सिमा अरविंद माने, दादासाहेब पायगोंडा पाटील, सुहास दादासाहेब पाटील, बाबासाहेब केराप्पा चौगुले, मनोजकुमार बाबासाहे चौगुले, मंगल चंद्रकांत साबळे, दिलीप महादेव शेंडगे, सगुणा दिलीप शेंडगे, संदिप दिलीप शेंडगे, नमिता सतीश घंटे, मल्लीकार्जुन बाबासाहेब पाटील, प्रसदा पांडूरंग जाधव, स्मिता ज्ञानेश्वर बागल, आप्पासाहेब सुरेश मॅंडगुळे, भिमराव महादू पिंपळे, बाबासाहेब पांडूरंग पिंजारी, सोनाजी प्रविण पडवळ, दिपाली अजित भोसले, रुपाली विजय देसाई, उषा पांडूरंग सप्ताख, विराज दिलीप पंचवाडकर, दिपा पांडूरंग पंचवाडकर, प्रकाश भालचंद्र सप्ताख, अनंत दिलीप सप्ताख, विलास ज्ञानदेव सरनोबत, प्रविण सिदू आव्हाड, सचिन सिदू आव्हाड.	११	२४३४
२	टाकळी	धनंजय तुकाराम ढोणे, सत्यभामाबाई तुकाराम ढोणे, तानाजी तुकाराम ढोणे, गणेश तुकाराम ढोणे, ढोणे शुभम बलभीम, ढोणे सुनिता बलभीम, ठवरे प्रगती विजय, तुकाराम देवाप्पा ढोणे, सोनाबाई सिताराम खताळ, पार्वती रामचंद्र खांडेकर, सविता शिवाजी अर्जुन	१२	१५३९ १ बोअरवेल व पाईपलाईन, डाळींब१३ झाडे
३	टाकळी	देवाप्पा निवृत्ती ढोणे, अनंता बाळू देठे, शंकर सौदागर आयरे अ.पा.क. जनाबाई, रामा जाती आयरे, लक्ष्मण विठोबा आयरे, पार्वती शिवा आयरे अ.पा. क. सुभद्रा, सुभद्रा शिवा आयरे, भिवा श्रीपती आयरे, भगीरथी श्रीपती आयरे	१३	३०३, विहीर
४	टाकळी	बळीराम अनंता देठे, बळीराम अनंता देठे, रुक्मीणी धनाजी जाधव, आशा योगेश चौगुले, शोभा शंकर शिंदे.	१४	३८३
५	टाकळी	गोकूळ धोंडीराम माने,विष्णु गर्जेंद्र कदम,शशिकांत तुकाराम भोसले, श्रीकांत शंकर कदम, दत्तात्रय भगवान चंदनशिवे, विजय सिताराम काळे अपाक मंगल सिताराम काळे, हणमंत बाळू कदम, प्रसन्नजित प्रियदर्शनी चंद्रशिवे अपाक पल्लवी, सुरेश सुखदेव ढोणे, रीकांत कालिदास चव्हाण, सत्यवान दिलीप गोडसे, सुशिला राजाराम खुणे, संपदा राहूल हिवरे	१६	२४४६
		एकूण		७१०५

वर नमूद मिळकतीबाबत कोणाचाही कोणताही हक्क / अधिकार असलेस अगर करार, दावा, मदार अथवा पतसंस्था, वित्तीय संस्था, सरकारी कार्यालये व निमसरकारी कार्यालये, आरक्षण असल्यास प्रस्तावित खरेदीस कोणाचीही काहीही हरकत असल्यास त्या सर्व संस्था आणि व्यक्तींना या नाटिसीद्वारे कळविण्यात येते की, सदरची नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसांच्या कालावधीत खालील पत्त्यावर त्यांची लेखी हरकत कार्यालयीन वेळेत आवश्यक त्या कागदपत्रांसह समक्ष भेटून सादर करावी. अन्यथा सदरची मिळकत निर्वेद, निजोखीम आहे. तसेच कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजून सदरहू मिळकतीचा प्रस्तावित केले प्रमाणे उक्त अधिनियमांनुसार संपादनाचे अनुषंगाने खरेदी व्यवहार करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही तक्रार वा हरकत ही ग्राह्य धरली जाणार नाही. तसेच सदरची नोटीस ही कोणाचेही नुकसान व फसवणुक होऊ नये म्हणून दिलेली आहे, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दिनांक :- २१/१०/२०२६

सही/- (अमित निमकर)
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग पंढरपूर

सही/- (सचिन इथापे)
उपविभागीय अधिकारी,
पंढरपूर विभाग पंढरपूर

जिमाका/सो/जाहि/१४६/२०२६-२७